पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/१३५८/१६
पुणे १ दिनांक :- २१ /१०/२०१६

प्रति,

**अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,**
**श्री पांडूरंग आप्पाजी काळे ट्रस्ट संचलित प्याराडाइस इंटरनॅशनल स्कुल, स.न. १५५/१ (चोविसवाडी) काळेवाडी, चऱ्होली बु (आळंदी नगरपालिका हदद) ता. हवेली, जि. पुणे**

विषय:- सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४), दि. २७ जुलै २०१६.
२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र. नाहप्र-२००९/(६६३/०९)माशि-१, दिनांक २० जून २०१२
३. शासन निर्णय एमएफएस-१०१६/प्र.क्र.६९/एसएम-२, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय, मुंबई ३२ दि. १७.६.२०१६.
४. मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र. शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/ २०१६/ १६८१६. दि. २७ जुलै २०१६ (यादी क्र. ९०८)

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना व दर्जावाढ करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. १ च्या पत्रानुसार **नविन शाळा स्थापन व दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ९ |
| १ | **श्री. पांडूरंग आप्पाजी काळे ट्रस्ट, मु. पोस्ट काळेवाडी, चऱ्होली बु, तालुका हवेली, जि. पुणे** | **प्याराडाइस इंटरनॅशनल स्कुल, मु. पो. काळे कॉलनी, स.न. १५५/१ (चोविसवाडी) काळेवाडी, चऱ्होली बु (आळंदी नगरपालिका हदद) ता. हवेली, जि. पुणे** | इंग्रजी | नवीन शाळा (सी.बी.एस.ई) | प्राथमिक (इ १ ली ते ५ वी) | स्वयंअर्थ सहाय्यित सन २०१६-१७ |

अटी व शर्ती

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदीनूसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
४. संदर्भ क्रमांक ०२ अन्वये सन २०१५-१६ मध्ये परवानगी देण्यात येत आहे.
५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.

७. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **UDISE** मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-

१. **मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.**
२. **मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.**
३. **मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.**
४. **मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१**
५. **प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड, म.न.पा., पिंपरी, पुणे**

# पुणे जिल्हा परिषद, पुणे.
## यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१.
## शिक्षण विभाग (प्राथमिक)
Email- edupri.zppune@gmail.com | ssapune1@yahoo.co.in


# प्रथम मान्यता

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा1/1639/1056/2023 पुणे 1 दिनांक: 04/09/2023

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
श्री पांडुरंग अप्पाजी काळे ट्रस्ट, मु. पोस्ट काळेवाडी, चऱ्होली बु, तालुका हवेली, जि. पुणे, पिन 412 105 संचालित प्याराडाइस इंटरनॅशनल स्कुल, ( 27252003216 ) मु.पो.काळे कॉलनी, स.नं. 115/1, (चोविसावाडी), काळेवाडी, चऱ्होली बु. आळंदी नगर पालिका हद्द, ता. हवेली, जि. पुणे

विषय - सन 2022-23 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ -
1.शासन निर्णय क्र. एसएफएस-1021/प्र.क्र.244/एसएम-2, दिनांक 19/05/2022 शालेय शिक्षण मंत्रालय, मुंबई

2.मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडील जा.क्र.शिउसं/प्राथ-204/ज.रा.कु./मान्यता कक्ष/पुवि/2023/7113,दिनांक 18/07/2023

3. शाळेकडील प्रथम मान्यता प्रस्ताव दिनांक 26/07/2023

4.श्री. संजय नाईकडे, प्रशासन अधिकारी, पिंपरी चिंचवड मनपा पिंपरी, पुणे यांचेकडील तपासणी अहवाल 08/09/2023

उपरोक्त संदर्भीय विषयांन्वये कळवण्यात येते की, आपल्या संस्थेने प्रथम मान्यता करीता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार व तपासणी अधिकारी यांनी केलेली शिफारशी नुसारआपल्या संस्थेस संदर्भ क्र .1 ते 4 नुसार खालील अटी व शर्तीवर इयत्ता 6 वी ते इयत्ता 8 वी साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | सुरु वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री पांडुरंग अप्पाजी काळे ट्रस्ट, मु. पोस्ट काळेवाडी, चऱ्होली बु, तालुका हवेली, जि. पुणे, पिन 412 105 | प्याराडाइस इंटरनॅशनल स्कुल, ( 27252003216 ) मु.पो.काळे कॉलनी, स.नं. 115/1, (चोविसावाडी), काळेवाडी, चऱ्होली बु. आळंदी नगर पालिका हद्द, ता. हवेली, जि. पुणे | इंग्रजी सी.बी.एस.ई. | नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित | इयत्ता 6 वी ते इयत्ता 8 वी | 2022-23 |

**अटी व शर्ती**

1. मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात शासनच्या परवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.
2. शाळा व्यवस्थापनाने शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर त्या शाळेची परवानगी रद्द होईल.
3. स्वयंअर्थ सहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमानुसार व विनियमानुसार करण्यात यावी.
4. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतींचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थ सहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा , मंडळ सलग्नता क्रमांक, UDISE कोड इ. तपशील दर्शविणारा फलक लावणे बंधन कारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन मान्यता पत्र क्र. एसएफएस-1021/प्र.क्र.244/एसएम-2, दिनांक 19/05/2022 मधील सर्व अटी व शर्ती पुर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
9. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 याअधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
11. भविष्यात या शाळेची प्रथम मान्यता बाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा न्याय प्रविष्ठ प्रकरण उद्भवल्यास सदरचा प्रथम मान्यता आदेश रद्द करण्यांत येईल.

(संध्या गायकवाड)
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे